**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, MAY-JUNE, 2019, VOL- 6/51*

# श्रीलंकेतील बुध्द धम्माचा उदय : एक अभ्यास

**धनंजय बाबुराव लोखंडे, पीएच. डी.**

*प्राध्यापक व संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पिन. ४११००७. इ.मेल– dhananjay.lokhande5@gmail.com*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

भारतीय संस्कृतीमध्ये अनेक वेळा श्रीलंकेचा उल्लेख आढळतो. या देशाला 'लंका' असेही म्हटले जात असे. ब्रिटीश राजवटीमध्ये तर या देशाला 'सिलोन' असे संबोधले होते. प्राचीन काळापासून ह्या देशाला 'सिंहल' असे म्हणत असत. रामायणातील रावण हा लंकेचा राजा होता. भारताचा आणि श्रीलंकेचा प्राचीन काळापासून जवळचा संबंध होता.

श्रीलंकेत बुध्द धम्म प्रस्तापित होण्यापूर्वी तेथे कोणताच धर्म नव्हता. वन्य जमातीतील प्रजा दगड, यक्ष–येक्षिणी आणि झाडे यांची पुजा करित असत. तसेच त्यांच्या टोळीतील होऊन गेलेल्या एखादया म्होरक्याला किंवा त्यांच्या पुर्वजांना ते यक्ष समजून त्यांची पुजा करित असत. श्रीलंकेतील समाजाच्या जडणघडणीमध्ये बुध्द धम्म येण्यापूर्वी भारतातून आलेल्या काही अन्य धर्माचाही सहभाग होता. महावंसामध्ये केलेल्या उल्लेखाप्रमाणे अनेक जैन मुनी तेथे गेले होते; त्याचबरोबर काही आजीवक, ब्राम्हण आणि परिव्राजक श्रीलंकेत होते. भारतीय व्यापारी श्रीलंकेतील रत्ने आणि मोती यांच्या व्यापारासाठी श्रीलंकेत जात होते. 'लाट' नावाच्या देशाच्या विजयसिंह या राजकुमाराने इ. स. ४८६ मध्ये दक्षिण गुजरात आणि उत्तर पश्चिम महाराष्ट्र मिळून 'ताम्रपर्णी' बेट जिंकले. त्यावेळी श्रीलंकेचे नांव 'ताम्रपर्णी' असे होते. राजा विजयसिंह च्या 'सिंह' या नावावरून ताम्रपर्णी या बेटाचे नांव 'सिंहल द्वीप' किंवा 'सिंहल' असे पडले. त्यामुळे तेथील लोकांना आणि भाषेला 'सिंहल लोक' किवा 'सिंहल भाषा' असे संबोधले गेले. युवान चुवान (फा–हियान आणि ह्यु–एन–त्सँग) यांच्या लिखानात ही श्रीलंकेला 'सिंहल' देश असे म्हटले आहे. इंग्रजांनी सिंहल या शब्दाचा अपभ्रंश करून 'सिलोन' असे म्हटले गेले. परंतु सम्राट अशोकाच्या शिलालेखात आणि जुन्या पाली वाङ्मयात श्रीलंकेचे नांव 'ताम्रपर्णी' असेच आहे. सन १९७२ या वर्षी तेथील शासनाने सिलोन चे अधिकृतरीत्या 'श्रीलंका' असे नामकरण केले. सन १७९६ या वर्षी ब्रिटिशांनी श्रीलंकेत प्रवेश केला. सन १८१५ या वर्षी त्यांनी कँडिचे राज्य जिंकले. तेंव्हापासून १९४८ पर्यंत श्रीलंकेवर ब्रिटिशांचे राज्य होते. सन १९४८ यावर्षी श्रीलंकेने स्वातंत्र्य मिळविले; आणि राष्ट्रमंडळाचा सदस्य या नात्याने हा देश स्वतंत्र झाला.

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

श्रीलंकेमधील लोक वेगवेगळया धर्मांचे आचरण करताना दिसतात. युनायटेड नेशनच्या तथ्यानुसार श्रीलंकेची सध्याची अंदाजीत लोकसंख्या २१, ३५१, ८२५ इतकी आहे. हि लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येशी तुलना करता ०.२८% आहे.

पुढील प्रमाणे श्रीलंकेमधील धर्मनिहाय लोकसंख्येचे वर्गीकरण करता येईल.

| वर्ष | बौध्द | | हिंदू | | मुस्लीम | | खिस्ती | | इतर | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | |
| १८८१ जनगणना | १,६९८,१०० | ६१.५३% | ५९३,६०० | २१.५१% | १,९७,८०० | ७.१७% | २,६८,००० | ९.७१% | २,३०० | ०.०८% | २,७५९,८०० |
| २०१२ जनगणना | १४,२७२,०५६ | ७०.१०% | २,५६१,२९९ | १२.५८% | १,९६७,५२३ | ९.६६% | १,५५२,१६१ | ७.६२% | ६,४०० | ०.०३% | २०,३५९,४३९ |

वरील विवेचनावरून एक बाब लक्षात येते की, श्रीलंकेमध्ये बौध्दांची लोकसंख्या हि जास्त आहे. वास्तविक पहाता श्रीलंकेमध्ये बुध्द धम्माचा प्रवेश बुध्द वर्ष २३६ साली म्हणजे इसवी सनापूर्वी २५० व्या वर्षी झाला. तेंव्हापासूनच 'बुध्द धम्म' हा श्रीलंकेचा राष्ट्रीय धर्म झाला. सन २००८ या वर्षी गॅलुप सर्वेक्षणानुसार श्रीलंका हा जगातील तिसरा सर्वात धार्मिक देश होता. 'धर्म' हा त्यांच्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाचा भाग आहे; असे ९९% श्रीलंकन व्यक्तींचे मत आहे. येथील बहुतांश सिंहली लोक बौध्द आहेत, मुसलमान मुख्यतः सुन्नी आहे तसेच ख्रिश्चन हे रोमन कॅथलिक आणि इतर ख्रिश्चन आहेत. सन १९७८ या वर्षी श्रीलंकन राज्यघटनेने धर्मस्वातंत्र्याची हमी देताना बौध्द धम्माला सर्वात महत्वाचे स्थान दिले आहे; त्यामुळे बौध्द धम्म हा श्रीलंकेचा 'अधिकृत धर्म' किंवा 'राज्य धर्म' ठरला आहे.

श्रीलंकेमध्ये सन २०१२ च्या जनगणनेप्रमाणे बौध्दांची (मुख्यतः थेरवादी) लोकसंख्या ७०. १०% इतकी आहे. इ. स. पूर्व तिसऱ्या शतकात बौध्द धम्माच्या स्थापनेनंतर बुध्दघोष सारख्या विद्वानांनी पाली त्रिपिटकाच्या माध्यमातून प्रबोधन व धम्मप्रसार केला. बुध्दघोष पंडिताने बौध्दशास्त्र ग्रंथावर अठ्ठकथा (अर्थकथा) नावाचे मोठे भाष्य केले आहे. बुध्द धम्माच्या संवर्धनासाठी आणि पुनरूज्जीवनासाठी सिंहली राजांची भूमिका अतिशय महत्वपूर्ण आहे. श्रीलंकेमध्ये साधारण ६००० बौध्द मठ—विहारे असून सुमारे १५,००० बौध्द भिक्खू आहेत. प्रामुख्याने सिंहली लोक बौध्द

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

धम्माचे आचरण करतात. विशेष म्हणजे २०१२ च्या श्रीलंकेच्या जनगणनेनुसार तमिळ लोकसंख्येत ११ भिक्खूंसह २२, २६४ इतकी लोकसंख्या बौध्दांची आहे. सन १९८८ मध्ये श्रीलंकेतील सिंहली भाषिक लोकसंख्येत सुमारे ९३% बौध्द होते. कॅन्डीमधील बुध्दांचा दात असणारे मंदिर हे येथील विशेष आकर्षण आहे. तत्कालिन सिंहलद्वीपात तिष्य नावाचा राजा राज्य करित होता तर हिंदुस्थानात सम्राट अशोकाचे साम्राज्य होते. सम्राट अशोकाच्या किर्तीने प्रभावित होऊन मैत्रीचा हात पुढे करण्यासाठी तिष्य राजाने आपला वकिल सम्राट अशोकाकडे पाठविला. सम्राट अशोकानेही आपला मुलगा महेंद्र याला आदर व्यक्त करण्यासाठी सिंहल येथे पाठवले. महेंद्रने राजा तिष्य यास बौध्द धम्माचा उपदेश केला. त्यानंतर सम्राट अशोकाची मुलगी संघमित्रा ही देखील राजा तिष्य यांचेकडे गेली. तिने आपल्या बरोबर नेलेली बोधीवृक्षाची फांदी राजा तिष्य यांना दिली. या फांदीचा झालेला बोधीवृक्ष अनुराधापुर येथे आहे. त्यानंतर संघमित्रानेही तिष्य राजाच्या राणीस व इतर स्त्रियांना बौध्द धम्माचा उपदेश केला; अशी कथा आहे. श्रीलंकेमध्ये एक बुध्दविहार जलाशयात आहे. नुवारा एलीया जिल्हयात ते कडाडोटा येथे आहे. १९७९ यावर्षी कोतमाले धरणाचे बांधकाम झाले. पाण्याची पातळी कमी झाल्यानंतरच हे विहार दिसते; म्हणून याला ‘हिडिंग टेंपल’ म्हणून ओळखले जाते. १९८५ या वर्षी या जलाशयाचे काम पूर्ण झाले. कोतमाले येथील या धरणामुळे सुमारे ५७ गावे आणि ४७ धार्मिक स्थळे पाण्याखाली गेली.

सन २०१२ च्या जनगणनेनुसार श्रीलंकेमध्ये हिंदूंची लोकसंख्या १२.५८% होती. त्यात तमीळ लोकसंख्या जास्तीची आहे. त्यांची भारतातील सैवेव भक्ती चळवळीशी संबंधीत आहे. तमीळ हिंदूंचा योगास्वामी हे सत्गुरू आहेत. रामकृष्ण मिशन, शिव सिध्दांत, नंदिनाथा संप्रदायाचे कार्य येथे आहे. श्रीलंकेमध्ये कोनेश्वरम मंदिरात रावणाचा पुतळा हा इतिहासाची साक्ष आहे.

मुस्लीम लोकसंख्या २०१२ च्या जनगणनेनुसार श्रीलंकेत ९.७% इतकी आहे. व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या मुस्लीमांनी येथे इस्लामचा प्रसार केला. ६ व्या शतकात, अरब व्यापाऱ्यांनी श्रीलंका आणि हिंदी महासागरावर जास्तीचे व्यापारावर नियंत्रण ठेवले. परंतू १६ व्या शतकात पोर्तूगीज श्रीलंकेत आल्यावर बऱ्याच अरब मुस्लीम लोकांचा छळ झाला. सध्या श्रीलंकेत मुसलमानांमध्ये धार्मिक आणि सांस्कृतिक असे विभाग आहेत. गाली येथील मशीद हे एक प्रार्थना स्थळ आहे.

ख्रिश्चन धर्माचा विचार करता त्यांची लोकसंख्या ७.६२% आहे. थॉमस अपोस्टल यांचेद्वारे पहिल्या शतकाच्या काळात श्रीलंकेमध्ये ख्रिश्चन धर्मांचे आगमन झाले. १५ व्या शतकात पोर्तुगीज मिशनऱ्यांपर्यंत ख्रिश्चनांची लोकसंख्या वाढली नाही. परंतू १७ व्या शतकात डचने श्रीलंका व डच मिशनरींवर कब्जा केला. त्यामूळे १६२२ पर्यंत श्रीलंकेची ख्रिश्चन लोकसंख्या २१% होती.

Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

निगोम्बो येथील सेंट सेबॅस्टीयंन्स चर्च हे येथील धार्मिक स्थळ होय. ख्रिश्चन धर्मामध्ये येथे रोमन कॅथलिक, अँग्लिकन आणि प्रोटेस्टंट आहेत.

**श्रीलंकेमधील बुध्द धम्म प्रसाराचे काही महत्त्वाचे टप्पे:**

- **सम्राट अशोक, महामहेंद्र व संघमित्रा:**

  श्रीलंकेमधील मुताशिव राजाचा दुसरा पुत्र म्हणजे देवनाम पिय तिस्स होय. आपल्या राज्यभिषेकानंतर राजा देवनामने मौल्यवान भेटवस्तू सम्राट अशोकाकडे पाठविल्या. या दोघांची मैत्री होती. सम्राट अशोकानेही राजा देवनामसाठी भेटवस्तु आणि सदिच्छा पाठविल्या. आणि एक संदेश सुध्दा पाठविला. ''मी बुध्द धम्म आणि संघाला शरण गेलो आहे. मी स्वत:ला शाक्यपुत्रांच्या धम्माचा उपासक मानतो. तू सुध्दा हे सर्वोत्तम पुरूषा, ह्या सर्वश्रेष्ठ त्रिरत्नांना तुझ्या शुध्द अंत:करणाने शरण जा.'' हा संदेश देवनाम राजांना वैशाख पौर्णिमेला मिळाला.

  महामहेद्र ज्येष्ठ पौर्णिमेच्या दिवशी श्रीलंकेतील अनुराधापुरच्या पुर्व दिशेला मिश्रक पर्वतावर — चैत्य पर्वत (मिहिन्तले) येथे पोहचले. ताम्रपर्णी द्विपात उत्सव सुरू होता. राजाचे महामहेंद्राबरोबर संभाषण झाले. स्वत:ची ओळख करून देताना महामहेंद्र म्हणाले, ''महाराज आम्ही धम्मराजाचे (बुध्दाचे) श्रावक श्रमण आहोत. तुझ्यावर कृपा करण्यासाठी जम्बुद्वीपातून येथे आलो आहोत.'' औपचारिक संभाषण झाल्यानंतर महामहेंद्राने 'चुलहात्थिपदोपम' सुत्ताचा प्रभावीपणे प्रवचन देऊन उपदेश केला. हे प्रवचन इतके प्रभावी झाले की, धम्मोपदेशाच्या शेवटी चाळीस हजार प्रजेसह राजाने बुध्द, धम्म आणि संघाला शरण जाऊन बुध्द धम्माचा स्विकार केला, आणि बुध्द धम्माचा प्रवेश श्रीलंकेत झाला. राजाची पत्नी अनुला आणि इतर महिलांना संघमित्रांनी दीक्षा देऊन श्रीलंकेचा भिक्खूणी संघ स्थापन केला. त्यापूर्वी राजाचा पुतण्या अरिठ्ठ आणि इतर पाचशे व्यक्तींना महामहेंद्रांनी दीक्षा देऊन श्रीलंकेचा भिक्खू संघ स्थापन केला होता.

- **राजा वट्टगामणी : त्रिपिटक पहिल्यांदा लिपीबध्द:**

  वट्टगामणी अभय राजाच्या कारकीर्दीचा काळ श्रीलंकेतील बुध्द धम्माच्या दृष्टिने अतिशय उल्लेखनीय काळ होय. इसवी सनापूर्वी १०३ साली गादीवर बसल्यावर तिय नावाच्या ब्राम्हणाने या राजाविरूध्द बंड पुकारले. तमीळ सैन्याने तियाला नष्ट करून वट्टगामणीचा पराभव केला. वट्टगामणी १४ वर्षे अज्ञानवासात राहिला. चौदा वर्षात बौध्द भिक्खूंची दयनीय अवस्था झाली. उपासमार झाली, मृत्यू झाले त्यामूळे त्रिपिटकाचा काही भाग नष्ट होऊ लागला. तरीही काहींनी प्रतिकुल परिस्थितीमध्ये अठ्ठकथा लिहून काढल्या. काही

भिक्खू आणि काही लेखनिक मतलेच्या शेजारी असलेल्या अलुविहार लेण्यात गेले आणि तेथे त्यांनी पहिल्यांदा त्रिपिटक लिपिबध्द केले.

- **पालि अठ्ठकथा—आचार्य बुध्दघोषः**

श्रीलंकेमध्ये आचार्य बुध्दघोष यांचमुळे पालि भाषेला विशेष महत्व आले. बुध्दघोष यांचा जन्म बुध्दगयेजवळ ब्राम्हण कुटुंबात झाला. त्यांचा वेद—उपनिषद यांवर गाढा अभ्यास होता, बुध्दी होती आणि प्रभुत्त्वही होते. त्यांचा तमलुक विहारात रेवत महाथेरांशी वादविवाद झाला. महाथेर आपल्यापेक्षा ज्ञानाने श्रेष्ठ आहेत अशी जाणिव त्यांना झाली. तेथेच बुध्दघोषांनी बुध्द धम्म स्विकारून बुध्द धम्माचे शिक्षण घेण्यास सुरूवात केली. बुध्दधम्माचे तत्त्वज्ञान आत्मसात करून त्यांनी 'ज्ञानोदय' नावाचा ग्रंथ लिहिला. श्रीलंकेतील महानाम राजाच्या काळात (इ. स. ४१० ते ४३२) बुध्द वर्ष ८९६ मध्ये अनुराधापुरातील महाविहाराच्या महाप्रधानगृहात ते राहिले. तेथील ग्रंथालयाचा वापर केला. बुध्दघोषांनी पालि भाषेत अनेक अठ्ठकथा लिहिल्या. पालि त्रिपिटकांचा योग्य अर्थ समजण्यासाठी या अठ्ठकथांशिवाय दुसरा पर्याय नाही. या अठ्ठकथांमध्ये बुध्दकालीन भारताची संस्कृती, राजनिती, कला—कौशल्य, समाज आणि इतिहासाची भरपूर माहिती आहे.

- **दीपवंस — महावंसः**

'दीपवंस' व 'महावंस' हे सिंहल (सिलोन) देशाचे बौध्द ग्रंथ आहेत. श्रीलंकेचा आणि बुध्द धम्माचा इतिहास सांगणारे हे दोन ग्रंथ होत. प्रदीर्घ काव्यात असणारे हे ग्रंथ पाली भाषेत आहेत. दीपवंसामध्ये २२ प्रकरणे असून बुध्दपूर्व काळापासून बुध्द धम्माची आणि श्रीलंकेच्या राजांची ऐतिहासिक माहिती यात आहे. दीपवंसामध्ये भिक्खूणींचा उल्लेख जास्त असल्याने तो भिक्खूणींनी लिहिला असावा, असे म्हटले जाते.

दिपवंसानंतर सुमारे पाचव्या शतकाच्या सुमारास 'महावंस' हा ग्रंथ महानाम स्थविर यांनी लिहिला. महानाम हे सिंहलचे राजे देवनाम पिय तिस्स यांचा सेनापती होय. महावंसात एकूण ३७ प्रकरणे आहेत. महावंस म्हणजे महान लोकांचा वंश आणि महान लोकांचा परिचय देणारा होय. डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांनी महावंस ग्रंथाचा हिंदीत अनुवाद १९४२ या वर्षी हिंदी साहित्य संमेलन प्रयाग येथून प्रकाशित केला. या दोन्ही ग्रंथांमध्ये सम्राट अशोकाबद्दल महत्वपूर्ण इतिहास आहे.

Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

- **गुणानंद श्रामणेर — ख्रिश्चन मिशनऱ्यांचा वादः**

श्रीलंकेत पणदूर येथे तेथील प्रमुख ख्रिश्चन आणि प्रमुख बौध्द यांचा वाद १८७३ मध्ये सुरू होता. श्रीलंकेतील प्रमुख वर्तमानपत्र 'दी सिलोन टाईम्स्ने' प्रत्येक वक्त्यांची भाषणे इंग्रजी मध्ये जशीच्या तशी छापली. गुणानंद थेरोच्या बुध्दीमत्तेने आणि वक्तृत्वाने ख्रिश्चन पराभूत झाले. बौध्दांमध्ये नवचैतन्य आले. वैभवशाली बौध्द संस्कृतीचे पुन्हा पुनरूज्जीवन सूरू झाले. अमेरिकेतील एक विद्वान डॉ. पीबल्स तेथे उपस्थित होते. अमेरिकेत गेल्यानंतर त्यांनी दोन्ही बाजूचे युक्तीवाद जसेच्या तसे पुस्तकरूपाने प्रसिध्द केले. कर्नल हेन्री स्टील ऑल्कॉटने अमेरिकेत सार्वजनिक ग्रंथालयात वाचले. १८७५ या वर्षी म्हणजे वयाच्या ४३ व्या वर्षी त्यांनी सर्व ऐहिक गोष्टींचा त्याग करून सर्व धर्मांचा सखोल अभ्यास करण्यासाठी मॅडम ब्लॅव्हस्की यांचे मदतीने थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना केली. पुन्हा १८८० या वर्षी मॅडम समवेत बुध्द धम्माच्या अभ्यासासाठी ते श्रीलंकेत आले; आणि प्रभावीत होऊन त्यांनी बुध्द धम्माचा स्विकार करून; ते श्रीलंकेतील बुध्द धम्माचे पुनरूत्थान करण्यासाठी झटू लागले. त्यांनी बौध्द उपासकांच्या सहकार्याने 'बुध्दीस्ट थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना केली. त्यातून बौध्द शाळा स्थापन केल्या. कर्नल ऑल्कॉट श्रीलंकेत आले तेंव्हा बौध्दांच्या फक्त तीन शाळा होत्या. १८९७ ला २५ मुलांच्या, ११ मुलींच्या आणि १० मिश्र शाळा झाल्या, १९०३ या वर्षी सोसायटीने १७४ शाळा स्थापन केल्या, आणि १९४० मध्ये बुध्दीस्ट शाळांची संख्या ४२९ झाली. कोलोंबोतील नालंदा आनंद कॉलेजेस्, कँडितील धर्मराजा विद्यालय, गल्लेतले महेंद्र विद्यालय, बम्बल पितियमध्यील विशाखा विद्यालय इ. कर्नल ऑल्कॉटच्या यशाची उदाहरणे होत. डिसेंबर १८८० मध्ये त्यांनी सिंहली भाषेतील 'सरसविसन्दरस' नावाचे वर्तमानपत्र आणि नंतर 'दि बुध्दीस्ट' वर्तमानपत्र सूरू केले. यंग मेन्स बुध्दीस्ट असोसिएशन यांनी पुढे 'दि बुध्दीस्ट' नावाचे मासिक काढले.

- **अनागरिक धम्मपाल आणि धम्माचे सांस्कृतिक पुररूज्जीवन:**

सन १८६४ मध्ये अनागरिक धम्मपाल यांचा जन्म कोलंबो येथे झाला. मुळ नांव डेव्हिड हेववितरण —मिशनरी शाळेत शिक्षण, पण घरचे वातावरण बौध्दमय होते. गुणानंद थेरांचे वाद स्वतः त्यांनी ऐकले होते. त्यातून स्फूर्ती घेऊन थेरांना आदर्श मानले. १८८३ मध्ये कॅथॉलिकांनी बौध्द मिरवणूकीवर अमानुष हल्ला केला. डेव्हीड यांनी कॅथॉलिक शाळा सोडली. बुध्दीस्ट सोसायटीचे ते सभासद झाले. स्वतःचे नांव धम्मपाल केले. पूर्ण वेळ बुध्दशासनाची सेवा करण्यासाठी ते 'अनागरिक' बनले. कर्नल ऑल्कॉट यांच्या दुभाष्याचे

काम अनागरिक धम्मपाल यांनी केले. ते भिक्खू झाल्यावर त्यांचे नांव देवामित्त धम्मपाल थेरा असे ठेवले.

कर्नल ऑल्कॉटच्या प्रयत्नाने श्रीलंकेत वैशाखी पौर्णिमेला सार्वजनिक सुट्टी जाहिर झाली; बौध्दांना मिरवणुका काढण्याचे स्वातंत्र्य मिळाले, आणि थेरवादी बौध्दांच्या अस्मितेचे प्रतिक असलेला धम्मध्वज विहारांवर आणि महत्वाच्या दिवशी उभारण्यात येतो. त्यांच्या प्रयत्नांमुळेच बौध्द लग्नाच्या नोंदी घेण्यासाठी रजिस्ट्रार ऑफ मॅरेजेसची नियुक्ती श्रीलंकेत करण्यात आली. श्रीलंकेची पहिली प्रिंटिंग प्रेस १८६२ या वर्षी गुणानंद थेरा यांनी सयामच्या राजाच्या मदतीने 'लंकोपकार प्रेस' बौध्दांची सुरू केली. पुस्तके छापुन जागृती केली.

- **कँडी येथील बुध्दांचा दंत धातू असलेले विहार:**

सिरिमेघवर्ण राजाच्या काळात भगवान बुध्दांच्या डाव्या दाढेचा एक दात श्रीलंकेत आणला गेला. हा दात कलिंगचा राजा गुहाशिव यांचेकडे होता. त्यांचेवर संकट आले तेंव्हा त्यांनी हा दात आपल्या हेममाला या मुलीकडे आणि तिचा पती दंतकुमार यांचेकडे दिला; त्यांनी तो दात श्रीलंकेला आणला. इ. स. १८५३ पर्यंत ब्रिटिशांच्या ताब्यात होता. तो कँडी येथील मुख्य भिक्खू यांचे ताब्यात दिला. या दाताला आदरांजली वाहण्यासाठी दरवर्षी ऑगस्ट महिण्यात पंधरा दिवस कँडी येथे मोठा उत्सव समारंभ होते. हि प्रथा शेकडो वर्षांपासून सूरू आहे. विमल धर्मसुरिय दुसरा (१६८७—१७०६) यांनी भगवान बुध्दांच्या दातासाठी कँडी येथे तीन मजली इमारत बांधली.

श्रीलंकेमध्ये ब्रिटिशांनी सन १७९६ या वर्षी प्रवेश केला. १८१५ या वर्षी त्यांनी कँडिचे राज्य जिंकले. १९४८ या वर्षापर्यंत श्रीलंकेवर ब्रिटिशांचे राज्य होते. १९४८ या वर्षी श्रीलंकेने स्वातंत्र्य मिळविले.

बुध्द धम्माचे पुनरूज्जीवन करण्यासाठी श्रीलंकेमध्ये सन १८८० या वर्षी 'दी बुध्दीस्ट थिऑसॉफिकल सोसायटी', सन १८९८ या वर्षी 'दी कोलंबो यंग मेन्स बुध्दीस्ट असोसिएशन' आणि सन १९१८ या वर्षी 'दी सिलोन बुध्दिस्ट कॉंग्रेस' स्थापन झाली. येथील यंग मेन्स बुध्दीस्ट असोसिएशने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कोलंबो येथे आयोजित केलेल्या बौध्द परिषदेसाठी निमंत्रित केले होते. २५ मे, १९५० रोजी त्यांनी 'भारतातील बौध्द धम्माचा विकास व विनाश' या विषयावर व्याख्यान दिले. डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर महाबोधी सोसायटीच्या भारतातील निरनिराळया ठिकाणी असलेल्या शाखांमध्ये श्रीलंकेल्या भिक्खूंनी धम्म स्विकारलेल्या नवबौध्दांना मोलाचे

Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

मार्गदर्शन केले. भारत आणि श्रीलंकेतील बुध्द धम्माचा दुवा अधिक बळकट होण्याच्या दृष्टिने हि बाब अतिशय महत्वपूर्ण ठरली.

**संदर्भ :**

*जगातील बुध्दधम्माचा इतिहास – मा. शं. मोरे. कौशल्य प्रकाशन,*
*औरंगाबाद – २ ऑक्टो. २००६.*
*भारतातील बौध्दधम्म – गेल ऑम्वेट*
*सेज पब्लीकेशन, न्यु दिल्ली – २०१६.*
*विश्वहृदय सम्राट अशोक – बबन लव्हात्रे*
*प्रबुध्द भारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय, १४ एप्रिल, २०१६.*
*https://mr.wikipedia.org/s/3 w Of*

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*